3/4

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
# विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १४, पुणे.

---

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, चे कलम २१, पोटकलम १ अन्वये प्रसिध्द करावयाचे "जाहीर नोटीस"

विषय :- भूसंपादन - पुणे (एल.ए. १३)
मौ.जुन्नर , ता.जुन्नर जि.पुणे येथील शहर सुधारित विकास योजनेतील कल्याण पेठ इंदिरा गांधी चौक ते पाडळी मुंढे हायस्कूल रोड पोच रस्ता (दक्षिण – उत्तर) हा ९.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता पाडळी गट नं.४ मधून जात असून, सि.स.नं.२५७, २६० व २६१ मधील बाधित क्षेत्राचे विकास योजना रस्त्यासाठी भूसंपादन करणेबाबत..

यानुसार जाहीररित्या नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे की, नवीन भूमि, पुनर्वसन अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये दि.१८ ते २४ जून, २०२० गुरूवार ते बुधवार रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ पृष्ठ क्र.५ ते ७ पुणे विभागीय पुरवणी वर प्रसिध्द झालेली अधिसूचना क्र.पीएलबी-२/कावि/२४/२०२० , दि.०२/०६/२०२० यास अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ सह भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये **मौ.जुन्नर , ता.जुन्नर जि.पुणे** येथील खालील अनुसूचित नमूद नुसार व नुकतीच निशाणी केलेली व त्यावर असलेली इमारत, झाडे, झुडपे वगैरेसह मोजलेली १४२.५१ चौ.मी. किंवा त्याहून अधिक अथवा कमी क्षेत्राची जमीन शासनाकडून लवकरच जुन्नर नगरपालिकेच्या मंजूर (दुसरी सुधारित) "विकास योजनेतील ९.०० मी. रस्ता" या सार्वजनिक प्रयोजनाकरिता संपादन करून ताब्यात घेण्याचे शासनाव्दारे निश्चित करण्यात आली आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबंध असलेल्या इसमांस यावरून कळविण्यात येते की, विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.१४, 'ए' विंग, १ ला मजला, नवीन जिल्हाधिकारी इमारत, पुणे – ४११००१ येथे खाली स्वाक्षरी करणार यांच्या कार्यालयात **दि. ३० सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता** जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर होऊन सदरहू जमिनीतील तुमच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि त्या संबंधातील तुमच्या भरपाईसंबंधीच्या दाव्याची रक्कम व तपशील तसेच उक्त भूसंपादन अधिनियमाच्या कलम २० अन्वये केलेल्या मोजणीसंबंधाने तुमच्या काही हरकती असतील तर त्या आवश्यक त्या कागदपत्रांसह दोन प्रतीत लेखी निवेदन कराव्यात.

4/4

## अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव - मौजे जुन्नर (पाडळी) ,ता.जुन्नर,जि.पुणे.

| अ.क्र. | सिटी सर्व्हे नं. | सर्व्हे क्र. | गट क्र. | संयुक्त मोजणी नकाशा व विवरणपत्रानुसार क्षेत्र (चौ.मी) | भूसंपादनाखालील क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | | (३) | (४) |
| १. | सिटी सर्व्हे नं.२६१ पै. | सर्व्हे क्र.११८ पै. | गट क्र.२ पै. | ६६.०३ चौ.मी. | ६६.०३ चौ.मी. |
| २. | सिटी सर्व्हे नं. २६० पै. | सर्व्हे क्र.१ पै. | गट क्र.३ पै. | ७६.४८ चौ.मी. | ७६.४८ चौ.मी. |
| | एकूण क्षेत्र | | | १४२.५१ चौ.मी. | |

जा.क्र. एलए-१३/ कलम २१(१)/22e
विशेष भूमी संपादन अधिकारी, क्र.१४,
'ए' विंग, १ ला मजला,
नवीन जिल्हाधिकारी इमारत,
पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६०६५७८८
दिनांक :-29/०८/२०२०

SBargal

(सं.ज.बारगळ)
विशेष भूमि संपादन अधिकारी,
क्र.१४, पुणे.

प्रत :

१. उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (समन्वय) शाखा, पुणे यांना माहितीस्तव.
कृपया सदरहू नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी, ही विनंती.

२. उपविभागीय अधिकारी, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे
सदरहू नोटीस कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याप्रमणे अहवाल पाठवावा, ही विनंती.

३. तहसीलदार, जुन्नर, ता.जुन्नर , जि.पुणे.
सदरहू नोटीस कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याप्रमणे अहवाल पाठवावा, ही विनंती.

४. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, जुन्नर, ता.जुन्नर जि.पुणे.
सदरहू नोटीस कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याप्रमणे अहवाल पाठवावा, ही विनंती.

५. मूख्याधिकारी, जून्नर नगर परिषद, ता.जुन्नर , जि.पुणे
सदरहू नोटीस कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याप्रमणे अहवाल पाठवावा, ही विनंती.

६. गाव कामगार तलाठी, मौ.जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे.
सदरहू नोटीस कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व त्याप्रमणे अहवाल पाठवावा, ही विनंती.

७. जागेवर डकविणेसाठी दोन प्रती.

d:\a.t.p.-1\lar cases\la 13 -जुन्नर\sect.21 junnar.docx